नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०९/०२/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत केरडी बस स्टॉप डुमरी कन्हान येथे दिनांक ०८/०२/२०२२ चे ०७:०० ते ०७:३० वा. दरम्यान एपी–०९/बीयु– ८०५५ क्रमांकाचा इन्होवा कार चालक आरोपी नामे– भुमेश विठ्ठल भगेली, वय ३६ वर्ष रा. मुडोल मंडल जिल्हा निर्मल, तलंगाना याने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–४०/टी– २७१५ क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– शेखर सुर्यभान ठाकरे वय ३४ वर्ष रा.खडाळा डुमरी हा गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकामी जे एन हॉस्पीटल कन्हान येथे नेले असता उपचारा दरन्यान त्याचा मुत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार श्री अरूण चिंतामण सहारे पोस्टे कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४(अ) भादवि सहक १८४ मो.वा.का कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री जावेद शेख पोस्टे कन्हान मो.न. ९४०३६९२७६६ हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. काटोल** :– फिर्यादी नामे– शबिना शाकिर शेख वय २८ वर्ष रा. पेठबुधवार काटोल व आरोपी नामे– १) पति– शाकीर मकबुल शेख हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावर पेटबुधवार काटोल येथे दिनांक ०९/०८/२०२० चे ०८.०० वा. ते दिनांक ०८/०२/२०२२ चे ०९.३० वा. पर्यंत यांनी संगनमत करून फिर्यादीला वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२३, ४९८ (अ), ५०६, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अरून भेंडे मो.क्र. ९९२३१९३६४२ हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. वेलतुर :–** अंतर्गत मौजा शिवनी शिवारातील आम नदीचे पात्रात येथे दिनांक ०६/०२/२०२२ चे ११:३० ते दिनांक ०८/०२/२०२२ चे १७:३० वा. दरम्यान **जयराम शिवराम हारगुळे (मृतक) वय ५२ वर्ष, रा.शिवनी ता.कुही** हा शेतावर आपल्या घरच्या गाई चारायला घेउन गेला होता. परंतु सायंकाळी गाई घरी आल्या तो घरी परत न आल्याने नातेवाईकांनी ईकडेतिकडे शोध घेतला असता मिळून आला नाही. पो.स्टे. वेलतुर येथे दि.०७/०२/२०२२ ला हरविले बाबत तक्रार दिली होती शोध घेत असता दि. ०८/०२/२०२२ चे १७.३० वा. दरम्यान शिवनी शिवारात असलेल्या आम नदीच्या पाण्यात जयराम हारगुळे याचे प्रेत तरंगताना दिसले. यातील मृतक हा आम नदीच्या पलीकडून गाई आणायला गेला असता पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किशोर सखाराम हारगुळे, वय ५२ वर्ष, रा.शिवनी ता.कुही यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा मधुकर शिवपाम हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**